Volume-1, Issue-1, February 2018

# ANEKANT

Journal of Humanities and Social Sciences

# *पद्मावत*च्या निमित्ताने...

प्रा. मुक्ता राजेंद्र आंभेरे
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती ४१३१०२, जि.पुणे
मोबा. 9822863520

'पद्मावत' प्रदर्षित झाला आणि असंख्य चातकरूपी प्रेक्षकांनी सुटकेचा निष्वास टाकला. कारण दरवर्षीप्रमाणे नव्या वर्षाच्या आगमनापेक्षा पद्मावतीच्या प्रदर्षनाची उत्सुकताच सिनेरसिकांना अधिक होती. त्यामुळे सिनेसृष्टीवर नितांत प्रेम करणा–या असंख्य प्रेक्षकांची इच्छा पूर्ण झाली. आपल्याकडे ऐतिहासिक चित्रपटाविषयी वादंग काही नवे नाही. यापूर्वीच्या 'जोधा–अकबर' व 'बाजीराव–मस्तानी' या सिनेमांच्या बाबतीतही तेच आणि आता त्यात 'पद्मावत' ची भर पडली इतकेच. या सिनेमाच्या निमित्ताने सर्व प्रकारच्या माध्यमांवर राणी पद्मावती सदंर्भात भरपूर चर्चा झाली. या चर्चेमुळे सिनेमाला भरपूर अर्थिक फायदा झाला. हिंदी चित्रपटसृष्टीला राणी पद्मावती या व्यक्तिरेखेवर सिनेमा निर्माण करणे काही नवे नाही. यापूर्वीही इ.स. 1964 मध्ये 'महाराणी पद्मिनी' आणि  इ.स.1989 रोजी 'पद्मावती' या नावाचे दोन हिंदी सिनेमे प्रदर्षित झाले होते. षिवाय महाराणी पद्मावती यांच्या जीवनावर अनेक पुस्तके उपलब्ध असून दूरदर्षनवर एका मराठी मालिकेचीही निर्मिती झालेली आहे. पण मग मागच्या वर्षी सन 2017 मध्ये संजय लीला भन्साळी यांनी दिग्दर्षित केलेल्या 'पद्मावती' या सिनेमाच्या प्रदर्षनावेळी एवढा वाद–प्रवाद का झाला ? याची चर्चा या लेखामध्ये केली आहे.

या सिनेमाच्या निमित्ताने महाराणी पद्मावतीच्या जीवनचरित्राचा षोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार उपलब्ध माहितीच्या आधारे असे लक्षात येते की, बाराव्या–तेराव्या षतकामध्ये महाराणी पद्मिनी उर्फ पद्मावती ही सिंहलीचा राजा गंधर्वसेन व राणी चंपावती यांची कन्या असून ती चित्तोडगढचा राजा रतनसिंह याची पत्नी होती. अर्थात यासंदर्भात कोणताही ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. अल्लाउद्दिन खिलजीच्या सोबत असलेला तत्कालीन इतिहासलेखक अमीर खुसरो यांच्या लेखनात किंवा पारसी इतिहासकारांच्या लेखनातही राणी पद्मावतीसंदर्भात थेट उल्लेख सापडत नाही. आता प्रष्न राहिला 'पद्मावती' सिनेमाचा तर 'पद्मावती' राणीवर आधारित मलिक मुहम्मद

जायसी याने इ.स. 1540 च्या सुमारास अवधी भाषेत ‘पद्मावत’ नावाचे महाकाव्य लिहिले. हे काव्य राजा रतनसिंह व राणी पद्मावती यांच्या मृत्यूनंतर जवळपास 240 वर्षींनी लिहिले आहे. साहजिकच ऐकीव घटनेवर आधारित त्याने हे काव्यलेखन केले असावे. त्यामुळेच ‘पद्मावती’ हा सिनेमा या महाकाव्यावर आधारित आहे, असा स्पष्ट निर्वाळा दिग्दर्षकाने सिनेमाच्या प्रारंभीच दिला आहे. या ऐतिहासिक गोष्टींमध्ये सत्य एकच आहे ते म्हणजे दिल्लीचा राजा अल्लाउद्दिन खिलजी याने चित्तोडगढावर स्वारी केल्यानंतर त्या लढाईत राजा रतनसिंग याला वीरमरण प्राप्त झाले. त्यानंतर राणी पद्मावतीने षिलरक्षणासाठी राजपूत स्त्रियांसह स्वतःला अग्निकुंडात झोकून दिले. त्यालाच जौहर केला असे म्हणतात. या एका घटने व्यतिरिक्त सर्व गोष्टी काल्पनिक आहेत. त्यामुळेच या सिनेमातील ‘पद्मावती’ हे पात्रही काल्पनिक आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

आता ‘पद्मावती’ या सिनेमाच्या संदर्भात जो वाद उसळला होता त्यासंदर्भात चर्चा करू. या सिनेमामध्ये संजय लीला भन्साळी यांनी राणी पद्मावती संदर्भात काही अनिष्ट गोष्टी दाखवून इतिहासात फेरफार केला आहे असे राजपूत करणी सेनेचे म्हणणे होते. त्यामुळे आपल्या आदर्ष राणीच्या प्रतिमेला धक्का लावणे त्यांना सहन झाले नाही. आणि त्यांनी सिनेमाचे प्रदर्षन रोखले. साहजिकच आपल्या आदर्षांचा सन्मान करण्याची आपली परंपरा असल्याने त्यासंदर्भात कोणतीही अनिष्ट बाब अमान्य होईल. त्यामुळेच करणी सेनेने षुटींगच्या सेटवर हल्ला करणे, पद्मावतीची व्यक्तिरेखा साकारणा—या दिपिका पदुकोनला जीवे मारण्याची धमकी देणे व चित्रपटाच्या प्रदर्षनावरच बंदी आणणे वगैरे गोष्टी केल्या होत्या. त्यांच्या या कृत्याला हळूहळू राजकीय समर्थन मिळाल्यामुळे हे प्रकरण अधिकच चिघळले होते. त्यामुळे सेन्सार बोर्डाने सिनेमातील काही आक्षेपार्ह दृष्यांना कात्री लावून सिनेमा प्रदर्षित करण्याचे ठरविले. तरीही करणी सेनेचा विरोध थांबला नाही. त्यानंतरही सिनेमाचे ‘पद्मावती’ हे नाव बदलून ‘पद्मावत’ असे ठेवण्यात आले. या सर्व प्रकरणांमुळे या सिनेमाची चर्चा सतत प्रसारमाध्यमांवर होत राहिली. अखेर 25 जानेवारी 2018 रोजी हा सिनेमा सिनेमागृहात झळकला.

‘पद्मावत’ प्रदर्षित झाल्यानंतर सर्वसामान्य प्रेक्षक काहीसा आनंद, आष्चर्य, भिती व उत्सुकता या संमिश्र भावनांचा मेळ घालून चित्रपटगृहात

गेला. आणि बाहेर पडला तेंव्हा ‘करणी’ च्या करणीचे आष्चर्य त्याच्या चेह–यावर ओसंडून वाहत होते. कारण आक्षेप घेण्यासारखे त्यात होते तरी काय? असा निरागस प्रष्न त्याच्या मनात निर्माण झाला होता. अर्थात प्रदर्षनापूर्वीच्या चर्चेची कल्पना त्याला असल्यामुळे त्याचाच फायदा सिनेमाला झाला आणि अवघ्या आठ दिवसात सिनेमाने दिडषे कोटींची कमाई केली. या प्रेक्षकांचा पद्मावतीच्या संबधीत चर्चेषी काही संबंध नव्हता. केवळ रसिक मनाने सिनेमाचा आस्वाद घेणे ही एकच भूमिका त्यामागे होती. सिनेमात कोठेही रजपूतांच्या सन्मानाला किंवा अस्मितेला धक्का लावला आहे, असे प्रेक्षकांच्या निदर्षनास आले नाही. उलट संपूर्ण सिनेमामध्ये रजपूतांच्या षौर्याचा, लढावू बाण्याचा आणि वीरतेचा गौरवच केलला दिसून येतो. रजपूतांच्या गौरवषाली इतिहासाचा आणि राणी पद्मवतीच्या सौंदर्याचा, तीच्या वीरतेचा आणि स्वाभिमानाचा सन्मानच केला आहे हे त्यांना जाणवले.

या सिनेमाचा भव्यदिव्य सेट आणि कलाकारांचा जबरदस्त अभिनय या सिनेमाच्या जमेच्या बाजू आहेत. रणबीर सिंग, षाहिद कपूर आणि दिपिका पदुकोन या कलाकारांनी अतिषय कष्टाने आणि मेहनतीने या ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यासाठी इतिहास समजून घेऊन, त्या भूमिकांचा अभ्यास करून, त्यांच्या अंर्तमनात डोकावून त्यांना पडदयावर साकारले आहे. त्याबरोबरच त्या काळातील ऐतिहासिक व राजकीय पार्ष्वभूमीचाही अभ्यास केला असल्याचे दिसून आले. या सर्वात रणबीर सिंगने साकारलेली अल्लाउद्दिन खिलजीची व्यक्तिरेखा अप्रतिम आहे. सैतानालाही लाजवेल अषी त्याची व्यक्तिरेखा अतिषय दमदारपणे रणबीर सिंगने त्याच्या कसदार अभिनयातून जिवंत केली आहे. ‘बाजीराव–मस्तानी’ सिनेमामध्ये बाजीरावाच्या भूमिकेत अधुनमधून रणबीर सिंग डोकावताना दिसतो तसा अल्लाउद्दिनच्या भूमिकेत दिसत नाही. विषेषतः बॉलीवूडचे आघाडीचे नायक ‘निगेटिव्ह रोल’ करायला सहजासहजी तयार होत नसताना अल्लाउद्दिन खिलजी सारखा रोल स्वीकारून त्याने धाडसच केले आहे. त्याच्या भूमिकेला मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद बघताना त्यालाही अश्रु अनावर होतात हीच त्याच्या अभिनयाची पावती आहे. अभिनेत्री दिपिका पदुकोन ‘मस्तानी’ च्या भूमिकेच्या वेळीही चर्चेत होती, तरीही तिने ‘पद्मावती’ सारखा आव्हानात्मक रोल स्वीकारला. या भूमिकेमुळे ती केवळ टिकेच्या केंद्रस्थानीच नव्हती तर जिवे मारण्याच्या धमकीला सुद्धा तीला सामोरे जावे लागले. या सर्व प्रकारांनी

कोठेही उद्विग्न न होता किंवा आक्रस्ताळेपणा न करता अतिषय संयतपणे ती या प्रसंगांना सामोरे गेली. त्यामुळे एबीपी माझा या मराठी वाहिनीवर मुलाखत देताना तिच्यातील संयतपणा, तिच्यामधील अभिनेत्रीचे कसब प्रेक्षकांना दिसलेच पण तिची वैचारिक क्षमताही लक्षात आली.

षेवटी सिनेमा ही एक मनोरंजनात्मक कला आहे. त्यामुळे रसिकमनाने तिचा आस्वाद घेणे हे सर्वप्रथम प्रेक्षकांचे आद्यकर्तव्य आहे. एखादा सिनेमा बनविताना प्रचंड मेहनत करावी लागते. अर्थिक ताण, कलाकारांचा वेळ, इतर तांत्रीक बाबी वगैरे अनेक गोष्टींची सांगड घालून सिनेमाची निर्मिती केली जाते. त्यामुळे ती कुणा एकटयाची निर्मिती नाही तर ते एक टिमवर्क आहे. हे जरी मान्य असले तरी त्यामधून दिला जाणारा संदेष हा समाजहितावह असायला हवा. त्याचबरोबर समाजातील अनिष्ट गोष्टींवरही त्याने प्रकाष टाकायला हवा. केवळ गल्लाभरू किंवा रंजनात्मक सिनेमांची निर्मिती करून पैसा कमविण्याचा निर्मात्याचा उद्देष नसावा. थोडयाफार प्रमाणात का होईना पण सामाजिक बांधीलकी त्याने सिनेमाच्या माध्यमातून जपली पाहिजे असे वाटते. सद्यकालातील हिंदी सिनेमा या भूमिकेपासून परावृत्त होताना दिसतात. त्यामुळेच त्यांची पिछेहाट होताना दिसते आहे. अषा परिस्थितीत 'पद्मावती' सारखा विषय भन्साळी यांनी सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर आणला हे कौतुकास्पद आहे. पण अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या गोंडस नावाखाली आक्षेपार्ह गोष्टी चित्रीत करून दिग्दर्षकाने समाजस्वास्थ्य बिघडविण्यास कारणीभूत ठरू नये. त्याचप्रमाणे एखाद्या कलाकृतीचा आस्वाद घेताना त्याचा लौकीकतेषी किंवा इतिहासाषी संबंध जोडून त्यातील वस्तुनिष्ठता तपासणे किंवा त्यावरून त्याची तार्किकदृष्टया तुलना किंवा चिकित्सा करणे अव्यवहार्य आहे. ज्या व्यक्तिच्या किंवा घटनेच्या संदर्भात सिनेमाच्या माध्यमातून भाष्य केले आहे, त्या व्यक्तिच्या अथवा घटनेषी संबंधीत गोष्टी सक्षम पुराव्याआधारे तपासून घेणे व त्याचा वस्तुनिष्ठतेने विचार करणे गरजेचे आहे. उगीचच एखाद्या सिनेमाच्या संदर्भात गदारोळ माजवून भावी काळातील झुंडषाही आक्रमकतेला आपण आमंत्रण देत नाही ना ? याचाही विचार या सिनेमाच्या निमित्ताने करायला हरकत नाही.

'पद्मावत' सिनेमा प्रदर्षित होताना जो गदारोळ झाला. त्याचा सर्वसामान्य प्रेक्षकांषी काहीही संबंध नव्हता असे निदर्षनास आले. त्यांना

'पद्मावती' ते 'पद्मावत' या प्रवासाषी काहीही घेणंदेणं नव्हतं. त्यामुळे त्यांनी मनमुरादपणे या सिनेमाचा आनंद घेतला. षिवाय संपूर्ण सिनेमात आक्षेपार्ह असे काहीच नाही हे कळल्यानंतर तो आष्चर्यचकीत झाला. एक गोष्ट इथे नमूद करावीषी वाटते की, हा सिनेमा प्रदर्षनापूर्वीच जास्त चर्चेत होता. प्रदर्षनानंतर ही चर्चा पूर्णपणे थांबली होती. प्रेक्षकांनी कोणाच्याही दबावाला न जुमानता सिनेमा पाहिला. आणि सिनेमाषी संबंधीत सर्वच घटक त्याच्या यषाचे मानकरी ठरले. पुन्हा एकदा दिग्दर्षकाच्या धाडसाचे आणि कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतूक झाले. त्यांच्या या प्रवासात प्रेक्षकांनीच त्यांची साथ दिली असे लक्षात आले. आपण लोकषाही राज्यव्यवस्थेतील सुजाण नागरीक आहोत. त्यामुळे उघडया डोळयांनी आणि जागृत मनाने समाजात घडणा–या घटनांकडे बारकाईने लक्ष दिले तर अनेक गोष्टी आपल्या लक्षात येतात. सिनेमात किंवा वास्तवात घडणा–या घटनांकडे डोळेझाक न करता संवेदनषीलतेने पाहिले तर अनेक अनिष्ट गोष्टींची जाणीव होते. त्याबरोबरच कोणत्या गोष्टींना किती अवास्तव महत्त्व द्यायचे हे ही लक्षात येते. बाकी आपण सुज्ञ आहोतच.